27 AUG 2022
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाला लवकरच ४० कोटी

## चंद्रकांत पाटील : वस्तुसंग्रहालयाचे बाबा कल्याणी यांच्या हस्ते उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाला जाहीर करण्यात आलेल्या ५० कोटींपैकी केवळ दहा कोटी रुपये मिळाले आहेत. आता या खात्याचा मी मंत्री आहे. त्यामुळे उर्वरित ४० कोटी लवकरच विद्यापीठाला दिले जातील, अशी घोषणा उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली.

पाटील यांच्या उपस्थितीमध्ये आणि भारत फोर्जचे अध्यक्ष आणि शिवाजी विद्यापीठाच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष बाबा कल्याणी यांच्या हस्ते शुक्रवारी शिवाजी विद्यापीठाच्या वस्तुसंग्रहालय संकुलाचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी शाहू छत्रपती कला दालनाचेही उद्घाटन करण्यात आले.

पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने नवनवीन गोष्टी सुरू कराव्यात, असे आवाहन मी याआधी देखील केले आहे. तसेच महापूर का येतो, त्याची कारणे आणि उपाय याबाबतही विद्यापीठाने अभ्यास करावा. बाबा कल्याणी म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने वस्तुसंग्रहालय संकुलाच्या उभारणीतून एका उत्तम कार्याची सुरुवात केली आहे. त्याद्वारे कोल्हापूरच्या शाहूकालीन वैभवशाली ऐतिहासिक वारसा लोकांना कायमस्वरुपी पाहण्यास खुला झाला आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले, दहा वर्षांपूर्वी या प्रकल्पाला सुरुवात केली. याचे लोकसहभागातून विस्तारीकरणही करण्यात येणार आहे.



ज्येष्ठ उद्योगपती बाबा कल्याणी यांच्या हस्ते शुक्रवारी शिवाजी विद्यापीठाच्या वस्तुसंग्रहालय संकुलाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. भारती पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. छाया.. नसिर अत्तार

### राजर्षी शाहू लोकजीवन कलादालनात...

या कलादालनामध्ये शाहूकालीन लोकजीवनाचे प्रतिबिंब पाहावयास मिळते. राजर्षींच्या जीवनकार्यावर प्रकाशझोत टाकणारी छायाचित्रे, माहिती यांसह तत्कालीन घरगुती वापराच्या वस्तू, चामडी वस्तू, कोल्हापुरी चपला, शस्त्रास्त्रे, सोन्या-चांदीचे दागदागिने, संगीतवाद्ये, मातीची व धातूची भांडी, खेळणी इत्यादी बाबी पाहता येतात.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, ज्येष्ठ इतिहास संशोधक जयसिंगराव पवार प्रमुख उपस्थित होते.

यावेळी मंत्री पाटील यांच्या हस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता एस. आर. पाटील, वास्तुविशारद विजय गजबर आणि कंत्राटदार अनिकेत जाधव यांचा सत्कार करण्यात आला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. यावेळी विद्यापीठाचे डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, वस्तुसंग्रहालय संकुल समितीच्या अध्यक्ष डॉ. भारती पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सरिता ठकार, डॉ. महादेव देशमुख, डॉ. मेघा गुळवणी, डॉ. नीलांबरी जगताप, यांच्यासह व्यवस्थापन परिषदेचे सदस्य उपस्थित होते.

### भारत फोर्जमध्ये कोल्हापूरच्या महाराजांची भागिदारी

कल्याणी यांनी आपल्या भाषणात एका वैयक्तिक हृदयस्पर्शी प्रसंगाचे वर्णन केले. ते म्हणाले, कोल्हापूरशी माझ्या कुटुंबाचे जिव्हाळ्याचे नाते जुळले आहे. आम्ही कराडजवळच्या एका गावचे. शंतनुराव किर्लोस्कर यांच्या सल्ल्याने १९६५ मध्ये वडिलांनी भारत फोर्जची स्थापना करण्याचे ठरविले. मात्र, निधीची अडचण होती. शंतनुरावांच्या पत्नी कोल्हापूरच्या. त्यांनी कोल्हापूरच्या महाराजांना भेटण्यास सुचविले. त्यावेळी कोल्हापूर संस्थानच्या भागिदारीतून भारत फोर्जची सुरुवात झाली, याची कृतज्ञ जाणीव आजही माझ्या मनी आहे.

27 AUG 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य आदर्शवत

## ज्येष्ठ उद्योगपती बाबा कल्याणी; विद्यापीठातील वस्तुसंग्रहालय संकुलाचे लोकार्पण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाने राजर्षी शाहू महाराज यांचे जीवनकार्य आणि कार्यास समर्पित वस्तुसंग्रहालय संकुलाच्या उभारणीतून उत्तम, आदर्श कार्याची सुरुवात केली आहे. कोल्हापूरचा शाहूकालीन वैभवशाली ऐतिहासिक वारसा लोकांना कायमस्वरूपी पाहण्यास खुला झाला आहे, असे गौरवोद्गार भारत फोर्ज उद्योग समूहाचे चेअरमन तथा शिवाजी विद्यापीठाच्या सल्लागार मंडळाचे अध्यक्ष ज्येष्ठ उद्योगपती बाबा कल्याणी यांनी काढले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ वस्तुसंग्रहालय संकुलामध्ये फीत कापून प्रवेश करताना ज्येष्ठ उद्योगपती बाबा कल्याणी, मंत्री चंद्रकांत पाटील. सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आदी. (छाया : नाज ट्रेनर)

शिवाजी विद्यापीठ वस्तुसंग्रहालय संकुलाचे लोकार्पण शुक्रवारी ज्येष्ठ उद्योगपती बाबा कल्याणी यांच्या हस्ते व उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाले. याप्रसंगी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, ज्येष्ठ इतिहास संशोधक जयसिंगराव पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

उद्योगपती बाबा कल्याणी यांनी शाहूकालीन वैभवशाली वारशाचा गौरव केला. राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवन कार्याची माहिती देणाऱ्या संकुलास आपले पाय लागले हे भाग्य आहे. विद्यापीठाने वस्तुसंग्रहालयाच्या उभारणीसाठी घेतलेल्या परिश्रमाचे कल्याणी यांनी कौतुक केले.

**विद्यापीठाला ४० कोटींचा निधी लवकरच देऊ : ना. चंद्रकांत पाटील**

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, शाहू महाराज यांचे कार्य मोठे आहे. त्यांनी करवीर संस्थानात अनेक महत्त्वाच्या गोष्टी केल्या. या वस्तुसंग्रहालयात काही नवीन दालने आणखी सुरू करावीत. शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त राज्य शासनाने ५० कोटी रुपयांच्या निधीची घोषणा केली होती. त्यापैकी १० कोटी रुपये दिले आहेत. उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून उर्वरित ४० कोटी रुपये लवकरात लवकर देऊ. याप्रसंगी मंत्री पाटील यांच्या हस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता एस. आर. पाटील, वास्तुविशारद विजय गजबर, कंत्राटदार अनिकेत जाधव यांचा सत्कार झाला.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रास्ताविक केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, वस्तुसंग्रहालय संकुल समितीच्या अध्यक्ष डॉ. भारती पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सरिता ठकार, डॉ. महादेव देशमुख, डॉ. मेघा गुळवणी, डॉ. नीलांबरी जगताप आदी उपस्थित होते.

**राजर्षी शाहू लोकजीवनाचे प्रतिबिंब कलादालनात**

राजर्षी शाहू लोकजीवन-कला दालनात शाहू महाराज यांचे जीवनकार्य, लोकजीवनाचे प्रतिबिंब पाहावयास मिळते. राजर्षींच्या जीवनकार्यावर प्रकाशझोत टाकणारी छायाचित्रे, माहिती यांसह तत्कालीन घरगुती वापराच्या वस्तू, चामडी वस्तू, कोल्हापुरी चपला, शस्त्रास्त्रे, सोन्या-चांदीचे दागदागिने, संगीतवाद्ये, मातीची व धातूची भांडी, खेळणी इत्यादी बाबी पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. संग्रहालयात ज्येष्ठ अभिनेते सूर्यकांत मांडरे व गीतकार जगदीश खेबूडकर यांचीही अन्य दालने उभारण्याचा मानस आहे, असे आवाहन डॉ. भारती पाटील व डॉ. नीलांबरी जगताप यांनी केले आहे.

### महाराजांच्या भागीदारीतूनच भारत फोर्जची मुहूर्तमेढ

कोल्हापूरशी माझ्या कुटुंबाचे जिव्हाळ्याचे नाते आहे. शंतनुराव किर्लोस्कर यांच्या सल्ल्याने १९६२ मध्ये माझ्या वडिलांनी भारत फोर्जची स्थापना करण्याचे ठरविले. मात्र, पैशाची अडचण जाणवत होती. शंतनुरावांच्या पत्नी कोल्हापूरच्या. त्यांनी कोल्हापूरच्या महाराजांना भेटण्याबद्दल सुचविले. त्यावेळी कोल्हापूर संस्थानच्या महाराजांच्या भागीदारीतून भारत फोर्जची मुहूर्तमेढ रोवली गेली. याची कृतज्ञ जाणीव आजही माझ्या मनात असल्याची भावना ज्येष्ठ उद्योगपती बाबा कल्याणी यांनी व्यक्त केली.

### महापुरावर तोडगा काढण्यासाठी शोधनिबंध स्पर्धा भरवा...

कोल्हापूर, सांगली परिसरास महापुराचा मोठा धोका आहे. महापुराच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी विद्यापीठाने या विषयावरील शोधनिबंधांची एक स्वतंत्र स्पर्धाच आयोजित करावी, अशी सूचना मंत्री पाटील यांनी केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

27 AUG 2022

पुण्यनगरी

# विद्यापीठाला ४० कोटींचा निधी लवकरच

## मंत्री चंद्रकांत पाटील, शिवाजी विद्यापीठाच्या वस्तुसंग्रहालय संकुलाचे लोकार्पण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त राज्य शासनाने ५० कोटी रुपयांचा निधी देण्याची घोषणा केली होती. त्यापैकी १० कोटी रुपये दिले आहेत. आता उच्च व तंत्रशिक्षण विभाग माझ्यांकडे आल्यामुळे उर्वरित ४० कोटी रुपयांचा निधी लवकरात लवकर देण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल, अशी ग्वाही उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठ वस्तुसंग्रहालय संकुलाचे लोकार्पण भारत फोर्ज उद्योग समूहाचे चेअरमन तथा शिवाजी विद्यापीठाच्या सल्लागार मंडळाचे अध्यक्ष बाबा कल्याणी यांच्या हस्ते झाले. यावेळी अध्यक्षस्थानावरून राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील बोलत होते.



**कोल्हापूर : वस्तुसंग्रहालय संकुलाचे उद्घाटन करताना ज्येष्ठ उद्योगपती बाबा कल्याणी, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील. सोबत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील व अन्य मान्यवर. (छाया : अर्जुन टाकळकर)**

मंत्री पाटील म्हणाले, महापुराच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी विद्यापीठाने या विषयावरील शोधनिबंधांची एक स्वतंत्र स्पर्धाच आयोजित करावी.

मंत्री पाटील यांच्या हस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता एस. आर. पाटील, वास्तुविशारद विजय गजबर व कंत्राटदार अनिकेत जाधव यांचा सत्कार करण्यात आला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी प्रास्ताविक केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, ज्येष्ठ इतिहास संशोधक जयसिंगराव पवार, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अजित चौगुले, डॉ. भारती पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सरिता ठकार, डॉ. महादेव देशमुख, डॉ. मेघा गुळवणी, डॉ. नीलांबरी जगताप आदी उपस्थित होते.

**राजर्षी शाहू लोकजीवन कलादालनात**

कलादालनामध्ये शाहूकालीन लोकजीवनाचे प्रतिबिंब पाहावयास मिळते. राजर्षींच्या जीवनकार्यावर प्रकाशझोत टाकणारी छायाचित्रे, माहिती यांसह तत्कालीन घरगुती वापराच्या वस्तू, चामडी वस्तू, कोल्हापुरी चपला, शस्त्रास्त्रे, सोन्या-चांदीचे अलंकार, वाद्ये, मातीची व धातूची भांडी, खेळणी इत्यादी बाबी पाहता येतात.

27 AUG 2022 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठास उर्वरित ४० कोटी लवकरच

## उच्च व तंत्रशिक्षणमंत्री पाटील; वस्तुसंग्रहालय लोकार्पण सोहळा

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त राज्य शासनाने ५० कोटींचा निधी देण्याची घोषणा केली होती. त्यापैकी १० कोटी दिले असून, उर्वरित ४० कोटी रुपयांचा निधी देण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल, अशी ग्वाही उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज येथे दिली. शिवाजी विद्यापीठ वस्तुसंग्रहालय संकुल लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते. भारत फोर्ज उद्योगसमूहाचे अध्यक्ष बाबा कल्याणी यांच्या हस्ते संकुलाचे फीत कापून उद्घाटन करण्यात आले. कोनशिलेचे अनावरणही झाले.

श्री. पाटील म्हणाले, ''विद्यापीठाने भविष्यात वस्तुसंग्रहालयाचा विस्तार होत राहावा, यासाठी प्रयत्नशील राहावे. त्याचप्रमाणे स्थानिक महापुराच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी विद्यापीठाने या विषयावरील शोधनिबंधांची एक स्वतंत्र स्पर्धाच आयोजित करावी.''

श्री. कल्याणी म्हणाले, ''विद्यापीठाने वस्तुसंग्रहालय संकुलाच्या उभारणीतून एका उत्तम कार्याची सुरुवात केली आहे. त्याद्वारे कोल्हापूरचा शाहूकालीन वैभवशाली ऐतिहासिक वारसा लोकांना कायमस्वरूपी पाहण्यास खुला झाला आहे.'' या वेळी त्यांनी हृदयस्पर्शी प्रसंगाला उजाळा दिला. ते म्हणाले, ''कोल्हापूरशी माझ्या कुटुंबाचे जिव्हाळ्याचे नाते जडल्याचा हा महत्त्वाचा प्रसंग आहे. शंतनूराव किर्लोस्कर यांच्या सल्ल्याने १९६५ मध्ये माझ्या वडिलांनी भारत फोर्जची स्थापना करण्याचे ठरविले. मात्र, निधीची अडचण होती. शंतनूरावांच्या पत्नी कोल्हापूरच्या. त्यांनी कोल्हापूरच्या महाराजांची भेट घेण्यास सुचविले. त्या वेळी कोल्हापूर संस्थानच्या भागीदारीतून भारत फोर्जची सुरुवात झाली, याची कृतज्ञ जाणीव आजही माझ्या मनात आहे.''

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, ज्येष्ठ इतिहास संशोधक जयसिंगराव पवार, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, वस्तुसंग्रहालय संकुल समितीच्या अध्यक्षा डॉ. भारती पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सरिता ठकार, डॉ. महादेव देशमुख, डॉ. मेघा गुळवणी, डॉ. नीलांबरी जगताप उपस्थित होते.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता एस. आर. पाटील, वास्तुविशारद विजय गजबर, कंत्राटदार अनिकेत जाधव यांचा सत्कार झाला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ वस्तुसंग्रहालय संकुलातील कोनशिलेचे अनावरण करताना ज्येष्ठ उद्योजक बाबा कल्याणी व उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील. शेजारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील.**

### समग्र शाहू आणि...

कलादालनात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवनकार्यावर प्रकाशझोत टाकणारी छायाचित्रे, माहिती यासह तत्कालीन घरगुती वापराच्या वस्तू, चामडी वस्तू, कोल्हापुरी चपला, शस्त्रास्त्रे, सोन्या-चांदीचे दागदागिने, संगीत वाद्ये, मातीची व धातूची भांडी, खेळणी पाहता येतात. त्याखेरीज संग्रहालयात अन्य दालने उभारण्याचा मानस डॉ. भारती पाटील व डॉ. नीलांबरी जगताप यांनी व्यक्त केला.

2 7 AUG 2022

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठासाठी उर्वरित ४० कोटींचा निधी देणार

## उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांची ग्वाही : शिवाजी विद्यापीठ वस्तूसंग्रहालय संकुल इमारतीचे उद्घाटन

- भारत फोर्जचे कार्यकारी संचालक बाबासाहेब कल्याणी यांची उपस्थिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाने कमी कालावधीत चांगले वस्तुसंग्रहालय उभारले आहे. यासाठी विद्यापीठाला ५० वर्षे पूर्ण झाल्यानंतर ५० कोटींचा निधी देण्याचा शब्द दिला होता. त्यातील १० कोटी निधीतून हे वस्तुसंग्रहालय साकारले आहे. उर्वरित ४० कोटींचा निधी देण्यासाठीही प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

विद्यापीठ वस्तू संग्रहालय संकुल इमारतीचे उद्घाटन शुक्रवारी सायंकाळी प्रमुख पाहुणे उद्योगपती बाबासाहेब कल्याणी यांच्या हस्ते झाले. संग्रहालयातील राजर्षी शाहू लोकजीवन कला दालनाचे उद्घाटन मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी मंत्री पाटील अध्यक्षस्थानावरून बोलत होते. कार्यक्रमाला कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्र कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्र कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, संग्रहालय समितीच्या डॉ. भारती पाटील, डॉ. निलांबरी जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती.





**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ वस्तुसंग्रहालय संकुल इमारतीचे उद्घाटन उद्योगपती बाबासाहेब कल्याणी आणि उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलगुरु डी. टी. शिर्के, प्र कुलगुरू पी. एस. पाटील, कुलसचिव व्ही. एन. शिंदे, भारती पाटील, निलांबरी जगताप आदी उपस्थित होते. यावेळी इमारतीच्या कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. दुसऱ्या छायाचित्रात विद्यापीठ वस्तूसंग्रहालय संकुलात राजर्षी शाहू लोकजीवन या कलादालनाच्या उद्घाटनप्रसंगी उद्योगपती बाबासाहेब कल्याणी, उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील व मान्यवर.**

मंत्री पाटील म्हणाले, संग्रहालयात आणखी काही दालने सुरू करावीत, त्यासाठी मदत करू. सुवर्णमहोत्सवी ५० कोटींपैकी उर्वरित ४० कोटी निधीसाठी प्रयत्न राहील. महापुरासंदर्भात वेगवेगळ्या भूमिका येत असताना या संदर्भात स्पर्धा घोषित केल्यास या प्रश्नांवर पर्यायही समोर येतील, असे त्यांनी सांगितले.

उद्योगपती कल्याणी म्हणाले, माझ्या वडिलांनी भारत फोर्ज कंपनी उभारली, पण त्यासाठीच्या भागीदारीसाठी कोल्हापूरच्या शाहू घराण्याची मोठी मदत झाली. त्यांच्या भागीदारीतून साकारलेला हा उद्योग विस्तारला आहे. त्यांच्या भूमीत वस्तुसंग्रहालयाच्या इमारतीचे उद्घाटन करण्याचे भाग्य आपल्याला लाभल्याचे सांगितले.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी प्रास्ताविक केले. मंत्री पाटील यांच्या हस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता एस. आर. पाटील, आर्किटेक्ट विजय गजबर, ठेकेदार अनिकेत जाधव यांचा सत्कार करण्यात आला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्र कुलसचिव व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, लेखाधिकारी अजित चौगुले, वस्तुसंग्रहालय संकुल समितीच्या अध्यक्ष डॉ. भारती पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, अधिष्ठाता डॉ. मेघा गुळवणी, डॉ. नीलांबरी जगताप, यांच्यासह व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

### राजर्षी शाहू लोकजीवन कलादालनाची पाहणी

दरम्यान, उद्योगपती कल्याणी आणि मंत्री पाटील यांनी वस्तुसंग्रहालयाची पाहणी केली. त्यांना डॉ. भारती पाटील आणि डॉ. निलांबरी जगताप यांनी माहिती दिली. या कलादालनात राजर्षी शाहूंच्या जीवनावरील ३० हून अधिक छायाचित्रे आहेत. शाहूकालीन पोशाख, शिवकालीन शस्त्रे, वापरातील भांडी, कोल्हापूर संस्कृतीची ओळख दर्शवणारे दागिने यांचा समावेश असल्याची माहिती जगताप यांनी दिली. तसेच संग्रहालयात अन्य दालने उभारण्याचाही मानस असल्याचे डॉ. पाटील, डॉ. जगताप यांनी सांगितले.

27 AUG 2022
लोकसत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विद्यापीठे, महाविद्यालयांची माहिती संकेतस्थळावर

# ‘नॅक’च्या मूल्यांकन प्रक्रियेत अधिक पारदर्शकता

## कार्यकारी समितीचे अध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांची माहिती

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेकडून (नॅक) होणाऱ्या प्रणालीत कागदपत्रांच्या संकलनात प्राचार्यांचा बराच वेळ जातो. त्यामुळे आता मूल्यांकनासाठी विकसित करण्यात येत असलेल्या नव्या संगणकीय प्रणालीत ऑनलाइन तंत्रज्ञानावर भर असल्याने मानवी हस्तक्षेप कमी होईल. तसेच नव्या प्रणालीअंतर्गत विद्यापीठे आणि महाविद्यालयांना त्यांची माहिती संकेतस्थळावर सार्वजनिकरीत्या प्रसिद्ध करावी लागणार आहे. त्यामुळे मूल्यांकन प्रक्रियेत पारदर्शकता येऊन नागरिकांनाही शैक्षणिक संस्थांची माहिती उपलब्ध होईल, अशी माहिती नॅकच्या कार्यकारी समितीचे अध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी दिली.

सेंटर फॉर एज्युकेशनल डेव्हलपमेंट अँड ॲडमिनिस्ट्रेशनतर्फे (सेडा) 'महाविद्यालय मूल्यांकन संकल्पना आणि पद्धतीतील बदल' या संदर्भात शैक्षणिक परिषदेमध्ये डॉ. पटवर्धन बोलत होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्रा. के. पी. मोहन, सेडाचे अध्यक्ष प्रा. अनिरुद्ध देशपांडे, सचिव धनंजय कुलकर्णी आदी उपस्थित होते. या परिषदेत पुण्यातील महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचालक आदी सहभागी झाले.

डॉ. पटवर्धन म्हणाले, की नॅक मूल्यांकनाला सामोरे जाताना शिक्षणाचा दर्जा उंचावण्याचे ध्येय असायला हवे. सध्याच्या मूल्यांकन प्रणालीत प्राचार्यांचा बरासचा वेळ कागदपत्रांच्या संकलनात जात असल्याने ही प्रक्रिया अन्य प्रक्रियांसारखी होते. त्यामुळे महाविद्यालयांच्या गुणवत्ता तपासणीसाठी नवी संगणकीय प्रणाली विकसित करण्यात येत आहे. या प्रणालीत ऑनलाइन तंत्रज्ञानावर भर असल्याने मानवी हस्तक्षेप कमी होईल. तसेच मनुष्यबळ, खर्च आणि वेळेची ३० टक्क्यांपर्यंत बचत होईल.

येत्या दीड महिन्यात उच्चस्तरीय समितीकडून प्रणालीचा मसुदा तयार झाल्यावर, पुढील वर्षापासून नव्या प्रणालीची अंमलबजावणी सुरू होईल. नॅकच्या मूल्यांकन प्रणालीत सकारात्मक बदल करण्यासाठी प्राध्यापक, प्राचार्य आणि शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या घटकांकडून सूचना अपेक्षित आहे. उच्च शिक्षणाचा दर्जा वाढवण्यासाठी आणि त्याच्या विकासासाठी सर्वांनी पुढे यायला हवे.

नॅक मूल्यांकनाच्या प्रक्रियेत परीक्षा पद्धती, अध्ययन निष्पती, मूक्स, प्राध्यापकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम याला महत्त्व येणार असल्याचे प्रा. के. पी. मोहन यांनी सांगितले.

पुढारी

# विद्यापीठ नियतकालिक स्पर्धेत विवेकानंद कॉलेज प्रथम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ नियतकालिक स्पर्धेत विवेकानंद कॉलेजने प्रथम क्रमांक पटकावला. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन म्हणून संलग्न महाविद्यालयांसाठी उत्कृष्ट वार्षिक नियतकालिक स्पर्धा विद्यापीठाने घेतली. नियतकालिकातून महाविद्यालयीन विद्यार्थी विविध साहित्य प्रकारात लेखन, कलेला अभिव्यक्त करतात. विवेकानंद कॉलेजच्या विवेक वार्षिक नियतकालिकाने बिगर व्यावसायिक गटात शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये द्वितीय, तर शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. या यशामुळे महाविद्यालयाच्या नावलौकिकात मोठी भर पडली आहे. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, रजिस्ट्रार सी. बी. दोडमणी यांनी अभिनंदन केले आहे.

पुढारी

# शिष्यवृत्ती अर्ज भरण्यास ३१ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

**कोल्हापूर :** भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत अनुसूचित जाती, विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी अद्यापही शिष्यवृत्तीचे अर्ज भरलेले नाहीत. त्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्यासाठी ३१ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर तत्काळ अर्ज भरावेत, असे आवाहन समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त सचिन साळे यांनी केले आहे.

27 AUG 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'बीज' गणेशमूर्ती कार्यशाळेस प्रतिसाद

## शिवाजी विद्यापीठाच्या उपक्रमाचे स्वागत

कोल्हापूर : प्रतिनिधी

सध्या सर्वत्र गणेशोत्सवाच्या तयारीचे वातावरण आहे. शिवाजी विद्यापीठात पर्यावरणपूरक 'बीज' गणेशमूर्ती बनवण्याची विशेष कार्यशाळा आयोजित केली. या कार्यशाळेत विविध अधिविभागांतील ५० विद्यार्थ्यांसह २५ शालेय विद्यार्थ्यांनीही सहभाग घेतला. टेराकोटा मूर्तिकार गौरव काईंगडे यांनी या कार्यशाळेत सहभागींना मार्गदर्शन केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरण अधिविभागातर्फे आयोजित पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मूर्तिकार गौरव काईंगडे.**

प्रदूषण टाळण्यासाठी शाडूच्या मूर्ती स्वतःच्या हातांनी बनवायच्या. त्यामध्ये विविध फुलझाडांच्या बिया खोवल्या जातात. ही मूर्ती घरी प्रतिष्ठापित केली जाते. विसर्जनावेळी तिचे घरीच एखाद्या कुंडीमध्ये विसर्जन करून त्यावर पाणी घातले की, पुन्हा या मूर्तीची माती बनते आणि त्यात खोवलेल्या बिया कुंडीत रुजतात. त्यांचे रूपांतर आकर्षक फुलझाडात होते आणि ही फुले पुन्हा आपल्याला आनंद देत राहतात. या संकल्पनेतून निसर्गाच्या घटकांपासून तयार केलेली गणेशमूर्ती पुन्हा निसर्गात कोणत्याही हानीविना विसर्जित करणे आणि ती परत करताना त्यातून पुन्हा निसर्ग फुलवणे, हे या कृतीतून साध्य होते.

कार्यशाळेचे उद्घाटन विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या प्रभारी अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार यांच्या हस्ते झाले. अधिविभागाच्या प्रमुख डॉ. आसावरी जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. पल्लवी भोसले यांनी या कार्यशाळेचे संयोजन केले. अनिरुद्ध व प्रांजली या विद्यार्थ्यांनी सूत्रसंचालन केले.

पुण्यनगरी

# युवा महोत्सवाबाबत कार्यशाळा

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी शिवाजी विद्यापीठातर्फे दरवर्षी युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. युवा महोत्सवाची माहिती होण्यासाठी, तसेच महोत्सवामध्ये जास्तीत जास्त महाविद्यालयांनी सहभागी होण्यासाठी कार्यक्षेत्रातील जिल्ह्यात एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे, अशी माहिती विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी दिली. जिल्ह्याची कार्यशाळा केआयटी कॉलेजमध्ये ६ सप्टेंबर, सांगलीची कार्यशाळा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पलूसमध्ये ७ सप्टेंबर, तर सातारा जिल्ह्याची कार्यशाळा बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटणमध्ये ८ सप्टेंबर रोजी घेण्यात येणार आहे. या कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील २ प्राध्यापक व ५ विद्यार्थी पाठवण्याचे आवाहन विद्यार्थी विकास विभागातर्फे करण्यात आले आहे.

तरुण भारत

# युवा महोत्सवासाठी सप्टेंबरमध्ये कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठांतर्गत विद्यार्थी



विकास विभागाकडून युवा महोत्सवासाठी एकदिवसीय कार्यशाळा घेण्यात येणार आहे. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात १० ते ५ या वेळेत त्या होणार आहेत. कोल्हापूर जिल्ह्यासाठी ६ सप्टेंबरला केआयटी कॉलेजमध्ये, सांगली जिल्ह्यासाठी ७ सप्टेंबरला पलुस येथील पलुस कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात तर ८ सप्टेंबरला सातारा जिल्ह्यासाठी पाटण येथील बाळासाहेब देसाई महाविद्यालयात युवा महोत्सव कार्यशाळा होणार आहे. यासाठी महाविद्यालयांनी ५ विद्यार्थी आणि शिक्षकांच्या नावाची यादी ३ सप्टेंबरपर्यंत विद्यार्थी विकास विभागाकडे पाठवावी, असे आवाहन संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी केले आहे.

27 AUG 2022

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विद्यापीठ, शाळा, महाविद्यालयात पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याचे विद्यार्थ्यांना धडे : माती, सीड गणेमूर्ती कार्यशाळांना प्रतिसाद

# ज्ञानमंदिरात पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा मंत्र








प्रतिनिधी
कोल्हापूर

गणेशोत्सव म्हंटले की सगळीकडे उत्साहाचे वातावरण असते. पर्यावरणपूरक मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याचे धडे शाळा–महाविद्यालयात दिले जातात. शिवाजी विद्यापीठ पर्यावरणशास्त्र विभागात 'सीड' गणेशा प्रतिकृती कार्यशाळेच्या माध्यमातून माती आणि फळ, फुलांच्या बियांपासून गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रशिक्षण दिले. गणेश विसर्जनादिवशी या गणेशमूर्तीचे विसर्जन शेतात किंवा कुंडीत करून पाणी प्रदुषणात घट करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

विद्यार्थ्यांना कागद, माती आणि सीडपासून स्वत:च्या हाताने गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रशिक्षण दिले जाते. मातीच्या गणेशमूर्तीला रंगीबेरंगी फुलांचे कलर दिले जातात. विद्यार्थी या गणेमूर्तीची घरात प्रतिष्ठापना करतात. तसेच या मातीच्या गणेशमूर्तीचे विसर्जन आपल्या घरातील कुंडीत करण्याचा सल्ला दिला जातो. ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी साऊंड सिस्टीम लावण्यापेक्षा पारंपरिक वाद्यांच्या गजरात अलीकडे बहुतांश लोक श्रीगणेशाचे स्वागत करतात. फटाक्यापेक्षा फुलांच्या पाकळ्यांची उधळण करतात. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासंदर्भात जनजागृती केली जात आहे.

## पर्यावरणपूरक डेकोरेशन

गणेमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यासाठी घरात फुल, फळांच्या कुंड्या, फुलांपासून पर्यावरणपूरक डेकोरेशन कसे करावे, यासंदर्भातही मार्गदर्शन तसेच डेकोरेशनसाठी कागदापासून आकर्षक वस्तू तयार करून त्याचा वापर करण्याचा सल्ला दिला आहे.

## फुला, फळांच्या रूपात गणपतीचा आशीर्वाद

शिवाजी विद्यापीठात गेल्या तीन वर्षापासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याचा वेगळा अनुभव विद्यार्थ्यांना दिला जातो. पंचगव्यपासून, त्रिगणेशा, यंदा 'सीड' गणेशा प्रतिकृतीच्या माध्यमातून फळ, फुलांच्या बियापासून गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रशिक्षण दिले. गणपती आगमनानंतर घरात पाच दिवस प्रतिष्ठापना, पूजा, आर्चा करून, या गणेशमूर्तीचे विसर्जन घरातील कुंडीत करण्याचा सल्ला दिला आहे. कारण गणपतीचा आशीर्वाद म्हणून ही फुले, फळे, झाडे कायमस्वरूपी घरात राहतील.



**डॉ. आसावरी जाधव (विभागप्रमुख पर्यावरणशास्त्र, शिवाजी विद्यापीठ)**

तरुण भारत

# महावीर अध्यासनातर्फे डॉ. देशमुख यांचा सत्कार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागातील डॉ. महादेव देशमुख यांची मानव्यशास्त्र विद्याशाखेच्या अधिष्ठातापदी निवड झाली. त्याबद्दल महावीर अध्यासनाच्या वतीने ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. जे. एफ. पाटील म्हणाले, डॉ. देशमुख अर्थशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत असून सामाजिक मूल्यांकन, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या आहेत. सत्काराला उत्तर देताना डॉ. देशमुख म्हणाले, भगवान महावीर अध्यासन भविष्यात जैन अध्ययनाचे राष्ट्रीय केंद्र म्हणून उदयास येईल. अध्यासनाचे समन्वयक डॉ. विजय ककडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

तरुण भारत

# बी. एस्सी., एम. एस्सी नॅनोसायन्स निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठांतर्गत उन्हाळी सत्रात ७४७ अभ्यासक्रमाच्या परीक्षा घेतल्या. त्यातील बी. एस्सी., एम. एस्सी. नॅनोसायन्स शाखा परीक्षांचे निकाल शुक्रवारी घोषित झाले. विद्यापीठांत शुक्रवारी बी.एस्सी., बी.ए., एम.बी.ए., एम.ए., बी.आर्च., एम. एस्सी., बी.फार्मा., एम.जे., बी.बी.ए., बी.ए.बी.एड्., बी.एड्, एम.एड्., शाखेच्या ११ विषयांच्या परीक्षा झाल्या. तर बी.एस्सी., एम.एस्सीं, नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजीच्या सेमिस्टर ७, ८, ९, १० तर एम. एस्सीं, नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजीच्या सेमिस्टर १, २, ३ व ४ या परीक्षांचे निकाल जाहीर झाल्याची माहिती डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

तरुण भारत

# भूकंपाचे धक्के विजापुरात नोंद शिवाजी विद्यापीठात..!

प्रतिनिधी
कोल्हापूर

कर्नाटकातील विजापूर जिल्ह्याला शुक्रवारी पहाटेच्या सुमारास ४ रिश्टर स्केलचा भूकंपाचा धक्का बसला. सकाळी सात वाजता दुसरा तर दुपारी अडीचच्या सुमारास तिसरा धक्का बसला. या तिन्ही भूकंपाच्या धक्क्यांची नोंद शिवाजी विद्यापीठातील भूकंपमापन केंद्रावर झाली आहे. दरम्यान, विजापूर जिल्ह्यात सप्ताहभरात भूकंपाच्या २३ धक्क्यांची नोंद झाली आहे.

शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागात भूकंपमापन केंद्र आहे. किल्लारीच्या भूकंपानंतर जागतिक बँककडून राज्याला काही भुकंपमापन यंत्रे मिळाली. त्यापैकी हे एक आहे. नवी दिल्ली आणि हैदराबाद येथील एनजीआरआय या रिसर्च सेंटरशी ते जोडले आहे. विद्यापीठातील या भूकंपमापन केंद्रावर पहाटे २.२१ वाजता ३.९ अर्थात ४ रिश्टर स्केलचा धक्का नोंद

- **आठवडाभरात विजापूरच्या ३० किलोमीटर परिघात २३ धक्क्यांची नोंद**
- **कोल्हापूर परिसरात दिवसभरात दोन धक्के**

झाला आहे. त्यानंतर सकाळी ६.५९ वाजता ३.८ रिश्टर स्केल आणि त्यानंतर दुपारी २.२४ वाजता २.६ रिश्टर स्केलचा धक्का नोंद झाला आहे. यातील मध्यरात्रीचा आणि सकाळचा भूकंपाचा धक्का जाणवला. पण दुपारचा धक्का जाणवलेला नाही. दरम्यान, या भूकंपाच्या धक्क्याचा केंद्रबिंदू विजापूर जिल्ह्यात आहे. विजापूर जिल्ह्यात ३० किलोमीटर परिसरात तो अधिक जाणवला. दरम्यान, २० ऑगस्टपासून २६ ऑगस्टपर्यंत विजापूर जिल्ह्यात २३ भूकंपाच्या धक्क्यांनी नोंद झाली आहे. कोल्हापूरातील या केंद्रावर हे धक्के नोंद झाल्याची माहिती सुत्रांनी दिली.